# महाराष्ट्र विधानसभा

**पाचवे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १९८, रूपये:- १३,०९,६५,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | ७५ | १० | ग्रामीण रूग्णालय भालवणी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करावयाचा प्रस्ताव सन २०११ च्या लोकसंख्याच्या आधारीत बृहत आराखड्यानुसार प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मा. सह संचालक, आरोग्य सेवा रूग्णालय, राज्यस्तर मुंबई यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला असणे, शासनाने अद्याप प्रस्तावास मंजूरी न दिल्याने येथील ग्रामस्थांना आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, ग्रामीण रूग्णालय भालवणी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२) | ४५ | १० | भंडारा जिल्ह्यातील साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ईमारती जिर्ण अवस्थेत असणे, तालुका स्तरावरील उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलेसिस युनिट उपलब्ध नसणे, लाखनी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पोहरा येथील ईमारत जिर्ण अवस्थेत असल्यामुळे तेथील रूग्णांची गैरसोय होत असणे, त्यामुळे ग्रामीण भागातील रूग्णांना उपचाराकरीता शहरी भागामध्ये ये-जा करण्याकरीता मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होणे, प्राथमिक आरोग्य केंद्रात अत्याधुनिक सोई-सुविधा उपलब्ध नसणे, त्यामुळे सुविधांच्या अभावामुळे रोगांचा प्रसार होणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २०३, रूपये:- ३९,१९,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (३) | ८१ | १० | उमरेड येथे ग्रामीण रुग्णालयाला नुकताच उपजिल्हा रुग्णालय म्हणून दर्जा प्राप्त झाला असणे, त्यात 50 खाटांचे रूपांतरित झाले असणे, याबाबतचे अंदाज पत्रके तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आले असणे,परंतु सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित असणे, त्यामुळे उमरेड येथील उपजिल्हा रुग्णालय येथील प्रलंबित असलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकात शासनाने प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: २०५, रूपये:- ४,८३,७४,३९,०००/-**<br>**श्री. अभिजीत पाटील** |
| (४) | २५ | १०० | माढा ता. जि. सोलापूर ग्रामीण रुग्णालयात आवश्यक ती यंत्रसामुग्री, पुरेसा प्रशिक्षित कर्मचारी नसल्याने तेथील ग्रामस्थांना उपचाराकरिता महागडया रुग्णालयात जावे लागणे, याकरिता या ग्रामीण रुग्णालयात आवश्यक ती यंत्रसामुग्री व मनुष्यबळ देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १९ डिसेंबर, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.